डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ व संलग्न संस्थेतील सुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचारी व निवृत्तिवेतनधारक / कुटूंब निवृत्तिवेतनधारकांना दि.०१ जुलै,२०२५ पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.....

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थप्रशासन विभाग

**वाचा :** १)वित्त विभाग शासन निर्णय क्र.मभवा-१३२५/प्र.क्र.१९/सेवा-९, दि.२५ फेब्रुवारी,२०२६.
२)वित्त विभाग शासन निर्णय क्र. निमवा-२०२६/प्र.क्र.१४/ सेवा ४, दि.२६ फेब्रुवारी,२०२६.

## आदेश

जा.क्र./अप्रवि/ मभवा-निमवा/२०२५-२६/३१४१ दिनांक : १३/०३/२०२६.

शासनाने उपरोक्त शासन निर्णय **दि.२५ फेब्रुवारी,२०२६ व दि.२६ फेब्रुवारी,२०२६** अन्वये ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचनेतील वेतन घेणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या मूळ वेतनावरील व निवृत्तिवेतन धारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारकानां मूळ निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतनाच्या एकूण रकमेवर अनुज्ञेय महागाई भत्याचा दर दिनांक १ जुलै,२०२५ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ५५ टक्के वरुन ५८ टक्के (म्हणजेच सद्याच्या महागाई भत्यात ०३ टक्के वाढ) सुधारीत करण्यात आला आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील **अधिकारी/ कर्मचारी व निवृत्तिवेतनधारक /कुटूंब निवृत्तिवेतनधारक** यांना माहे जुलै २०२५ ते ऑक्टोंबर २०२५ या कालावधीतील महागाई भत्याची वाढ रोखीने देण्यात यावी व उर्वरीत कालावधीतील थकबाकीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरहू महागाई भत्ता वाढ माहे फेब्रुवारी-२०२६ पासून रोखिने देण्यात यावी व माहे जुलै २०२५ ते ऑक्टोंबर २०२५ या कालावधीतील थकबाकी मार्च २०२६ च्या नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात अदा करावी किंवा त्यापुढील नियमित मासिक नियमित वेतन व निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन देयकात समावेश करावा मात्र याबाबत पुरवणी देयक सादर करु नये अशी पुरवणी देयक पारित केली जाणार नाहीत.

महागाई भत्ता वाढीच्या अनुषंगाने होणारा वाढीव खर्च हा सन २०२६-२७ चे मंजूर वेतन व निवृत्तीवेतन लेखाशीर्षाखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

भा.कृ.अ.प. योजनातंर्गत २०२६-२७ करीता वेतन अनुदानाची मागणी करतांना संबंधीत कार्यान्वयन अधिकाऱ्यांनी प्रस्तुत महागाई भत्यात वाढ विचारात घेऊन त्यानुसार वेतन अनुदानाची मागणी करावी.

मा.कुलगुरु महोदय यांच्या मंजुरीने.....

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला

मागील पानावर........

R.RAUT Bud

**प्रतिः** १) नियंत्रण अधिकारी (सर्व)/आहरण व संवितरण अधिकारी(सर्व)/विभागप्रमुख (सर्व)

..........................................................................................................

२) प्राचार्य, ..........................................................................................

३) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक

R.RAUT Bud

633
13/03/2026